महाराष्ट्रशासन

# शासकीयवैद्यकीयमहाविद्यालय, नंदुरबार

जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, साक्रीरोड, नंदुरबार - ४२५४१२

# GOVERNMENT MEDICAL COLLEGE, NANDURBAR

DISTRICT CIVIL HOSPITAL AREA, SAKRI ROAD, NANDURBAR – 425412

जा.क्र.शावैमनं/भांडार/ सि.ए/दरपत्रक/ 2459 /२०२३ दिनांक: 5 /09/२०२३

**दरपत्रक मागणीपत्र**

प्रति,

१)

२)

३)

विषय:- सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरिता CA ची नेमणूक करणे बाबत.

**दरपत्रक मोहोरबंद लिफाफे सादर करणे बाबत.**

महाविद्यलया अंतरगत असलेल्या वेतन देयक, रोखा विभाग व आकस्मित देयक विभागांच्या मागणीनुसार सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरिता या संस्थेत वस्तु व सेवा पुरवठा करणाऱ्या पुरवठादार कंपनीचे नियमाप्रमाणे टिडिएस/जीएसटी रिटर्न व अधिकरी /कर्मचारी यांचे फॉर्म नं. १६ ऑनलाईन तयार करण्यासाठी तसेच लेखा व रोखा विषयाचे कामकाज करणेसाठी सि.ए. ची नेमणुक करणेसाठी दरपत्रके मागविण्यात येत आहे. आपला मोहोरबंद दरपत्रकाचा लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्तीनुसार सादर करावा.

**महत्त्वाच्या अटी व शर्ती**

१) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा दिनांक १६.०९.२०२३ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही / ग्राह धरले जाणार नाही.

२) सुचना फलक / संस्थेच्या संकेतस्थळावर जाहीर नोटीसप्रमाणे इच्छुक कंपनीस देखील दरपत्रक मोहोरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे.

३) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा "अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नंदुरबार" यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सारद करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहोरबंद लिफाफयावर पुरवठा करावयाच्या **सि.ए** लिफाफयावर डाव्या बाजूस " **दरपत्रक**" लिफाफा जमा करण्याचा दिनांक अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

४) दरपत्रक मोहोरबंद लिफाफे ही दिनांक २१ /०९/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता मा.अधिष्ठाता यांच्या दालनात संस्थास्तरावर गठीत समितीसमोर उघडण्यात येतील. आपणास जर दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजि वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहावा.

५) दरपत्रकातील दर हे सन २०२३-२४ या अर्थिक वर्षा करिता ग्राहय राहतील. करीता आपणास ग्राहय दरानेच सेवा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

६) प्रस्तावित सेवेकरीता दरपत्रकात आकारण्यात आलेल दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमी दराचे परपत्रक व सेवेचा दर्जा / गुणवत्ता उत्कृष्ठ असेल, अशाच दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

७) सदर वस्तुंची किंमत, जीएसटी कर व एकुण किंमत असे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

८) दरपत्रक मोहोरबंद लिफाफयात सादर करावयचे दस्तऐवज :- अ) अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे. ब) दुकानाचा परवाना/व्यावसाय नोंदणी प्रमाणपत्र. क) पॅन कार्डची प्रत. ड) अनुभव प्रमाणपत्र इ) जी.एस.टी.प्रमाणपत्र ई) आयकर विवरणपत्र

९) सदर सेवा पुरवठा आदेश दिल्यानंतर दरपत्रक तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार सेवा पुरवठा विहित मुदतीत करणे आपणावर बंधनकारक राहील. विहित मुदतीत सोबत जोडलेल्या यादीनुसार व विनिर्दिष्ठेनुसार वस्तुंचा पुरवठा न केल्यास द्वितीय न्युनतम दरपत्रकधारकास पुरवठा आदेश देण्यात येतील.

१०) अपवादात्म परिस्थितीमुळे उक्त कोणत्याची अटीत आवश्यतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे, तसेच कोणत्याची स्तरावर खरेदीप्रक्रिया रदद करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नंदुरबार.) यांनी राखुन ठेवलेले आहेत.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नंदुरबार.

प्रत:-१)कार्यालय सुचना फलक २) College Website